# कामगार चळवळीतील अण्णाभाऊ साठे यांचे योगदान

**डॉ. निकम राजश्री दिलीप,** इतिहास विभाग,

कृष्णा महाविद्यालय, रेठरे बुद्रुक, ता. कराड जि. सातारा, rdnikam73@gmail.com

---

सांगली जिल्ह्यातील वाटेगाव या छोट्याशा ग्रामीण गावात जन्मलेले अण्णाभाऊ साठे यांनी लहानपणापासून दारिद्र्याचे अनेक चटके सोसत आपल्या अनुभवाच्या जोरावर वास्तव जीवनाची अनुभूती आपल्या साहित्यात लेखणीच्या द्वारे उमटवली व उत्कृष्ट साहित्यिक म्हणून आंतरराष्ट्रीय पातळीवरील आपल्या कार्याचा ठसा उमटविला उत्कृष्ट साहित्यिक निर्मिती द्वारे समाजातील अनेक घटना मांडल्या त्यांच्या साहित्य निर्मितीत वास्तव जीवन जगणारी अनेकपात्रे दिसून येतात त्यांच्या साहित्यात शेतकरी कष्टकरी यांचे जीवन त्यांच्या समस्या दिसून येतात लोकशाहीर म्हणून अण्णाभाऊंनी आपल्या साहित्यात पोवाडा लावणी गीतात शेतकऱ्यांच्या कामगारांच्या कष्टकरी वर्गाची जीवन याचे चित्रण केल्याचे दिसून येते व प्रस्तुत शोधनिबंधात आणि कामगार चळवळीसाठी दिलेल्या योगदान थोडक्यात मांडले आहे.

उद्दिष्टे :- १) अण्णाभाऊ साठे यांचा जीवन चरित्राचा थोडक्यात आढावा घेणे

२) अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचा आढावा घेणे

३) त्यांचे साहित्यातून व्यक्त झालेल्या कामगारांच्या समस्या चा आढावा घेणे.

४) अण्णाभाऊंनी कॉंम्रेड म्हणून बजावलेल्या कामगिरीचा थोडक्यात आढावा घेणे.

५) अण्णाभाऊ साठे यांच्याआंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्याचा आढावा थोडक्यात घेणे.

**अण्णाभाऊंचे जीवन चरित्र :-**

कथा कादंबरी नाटक लावणी पटकथा पोवाडे प्रवासवर्णन अशा वेगवेगळ्या साहित्य प्रकारातील लेखन करणारे अण्णाभाऊ साठे यांचे जन्मगाव वाटेगाव हे सांगली जिल्ह्यातील होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण याच गावात झाले. परंतु ते मध्येच त्यांनी सोडले असले तरी आपल्या प्रयत्नाने अक्षर ज्ञान त्यांनी जाणून घेतले. 1932 ला ते आपल्या वडिलांसोबत उदरनिर्वाहसाठी मुंबईला आले कोळसे वेचणी फेरीवाल्यांच्या पाठीमागे गाठोडी घेऊन फिरणे मुंबईच्या गोरबाग गिरणीत झाडूवाला म्हणून नोकरी अशी कामे करत असताना मुंबईत गिरणी कामगारांचे कष्टमय दुःखाचे जीवन त्यांनी पाहिले तेथून त्यांच्या साहित्यात त्यांच्या प्रश्नांची समस्येची दखल घेऊन लेखन सुरू केले कम्युनिस्ट पक्षाचे नेते श्रीपाद अमृत डांगे यांच्या प्रभावाखाली ते कम्युनिस्ट पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते झाले 1942 च्या संग्रामात ते सक्रिय सहभागी होते. मुंबईत लोकशाहीर म्हणून लौकिक प्राप्त केला. 1944 साली शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने लालबावटा कलापथक स्थापन केले त्यांच्या 35 कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

पोवाडा लावण्या किसान गीते मजूर गीते लोकनाट्य अण्णाभाऊंनी लिहिली .त्यांचे व्यक्तिमत्व मूलता तरल, संवेदनशील, महत्त्वकांक्षी ,जिद्दी आणि हरहुन्नरी होते. 1936 पासून त्यांचा साम्यवादी चळवळीशी जवळचा संबंध आला अण्णाभाऊ जातीय वर्गीय हितसंबंधाच्या पूर्ण तया विरोधी आहेत.प्रखर बुद्धिवाद समता स्वातंत्र्य विश्वबंधुत्व समाजवादी विचार वैचारिक सदनतेवर त्यांचा मागणी दृष्टिकोन उभा आहे क्रांतीसुक्ती गात गात आशावादी गिरीशिखरे वास्तवात उभी करण्याचा प्रयत्न करणे हा अण्णाभाऊंच्या समाज विचार प्रणालीचे सूत्र आहे मार्क्सने सांगितलेल्या आणि श्रमातून वाढीस लागणाऱ्या उत्पादन संबंधाशी तो निगडित आहे.[१]

एकजुटीचा नेता झाला कामगार तयार |
बदला रे दुनिया सारी दुमदुमली ललकार |
शेतकरी अन दालित जनाला घेऊनिया पाठी |
कामगार क्रांतीच्या आपल्या बिद्रासाठी |

वरील पंक्ती लोकशाही साहित्य कॉंग्रेड अण्णाभाऊ साठे यांचे हे गाणे शेतकऱ्यांच्या चळवळीचा वेध घेते .मुंबईत वास्तव्यास आलेल्या अण्णाभाऊंनी कापड गिरणीत कामगार म्हणून काम केले. 1934 ला मुंबईला आला मोठा गिरणी कामगार युनियनच्या नेतृत्वाखाली जो ऐतिहासिक संप झाला त्या संपत्ती कामगार म्हणून प्रत्यक्ष सहभागी झाले या संपदरम्यान शिवडी परिसरात कामगार व पोलिसात जी जगमग झाली त्याचेही त्यांचे साक्षीदार होते. पुढे कॉं. आर.बी.मोरे, के.एम. साळवी यांच्या संपर्कात अण्णाभाऊ आले. त्यांच्याकडून सामाजिक विषमतेच्या अन्याया विरुद्धच्या लढ्याची संघर्षाची माहिती त्यांना मिळाली. मुंबईत कामगार चळवळीचे लढे संघर्ष सुरू होते त्या गिरणीच्या गेटवर कामगार मैदानातील सभा, कार्यक्रमास अण्णाभाऊ व सहकारी गाणी गाऊ लागले.

1938 ते 1943- 44 पर्यंत शाहीर आण्णाभाऊ व त्यांच्या सहकार्याने मुंबईच्या गिरगावात जे संप लढे संघर्ष सुरू होते त्याच्या पाठिंबासाठी कलापथकाचे अनेक कार्यक्रम करून कामगारांमध्ये जागृती निर्माण केली. कॉम्रेड आण्णाभाऊ साठे, अमर शेख व दत्ता गव्हाणकर यांनी लालबावटा पथक स्थापन केले. पथकाच्या तीन प्रमुख शाहिरांचा महाराष्ट्रातून आलेल्या आदिवासी शेतकरी कष्टकरी कामगार यांना खरी ओळख पटली. अण्णा भाऊंनी शेतकऱ्यांच्या समस्या मांडण्यासाठी खास अकलेची गोष्ट या नावाने लोकनाट्य लिहिले शेतकरी कामगार या कष्टकरी त्यांच्यावरील संघर्षाची अत्याचाराची दखल आपल्या गाण्यातून पोवाड्यातून लोकनाट्यातून घेतली. मुंबईतील गिरणी कामगार माझी मुंबई बोनस चा लढा लवादाचा एका प्रकार पोवाडा लोकनाट्यातून मालक मजूर संबंध भांडवलशाही लोकशाही कष्टकऱ्यांचे शेतकऱ्यांचे शोषण मांडले.[२]

समकालीन सामाजिक वास्तव राजकीय चळवळी आणि जीवनातील लढे यांच्याशी निगडित नवे अनुभव नवे आशय यांची जोड देऊन अण्णाभाऊंनी शाहिरी परंपरा जतन केली. लोक रंजना बरोबर लोकशिक्षण लोक जागृती करून समाजातील समूह शक्तीला आव्हान करायचे शोषित पीडित वंचित उपेक्षित जनसमूहाविषयी अण्णाभाऊंच्या मनात कळवळा होता.[३]

अण्णाभाऊंनी वास्तव जीवनाच्या अनुभवातून मार्कस व लेनिन यांच्या तत्वविचारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वविचारातून श्रमिक वर्गाच्या संघर्षशील चळवळीतून प्राचीन संत कवीपासून अर्वाचीन काव्यपरंपरेतून त्यांनी मानवी मूल्ये, समाज मूल्ये, जीवनमूल्ये स्वीकारली.[४]

**मुंबई गिरणी कामगार व अण्णाभाऊंची भूमिका** :

अण्णाभाऊंचा पोवाडा म्हणजे गिरणी कामगारांचा 1908 ते 1950 पर्यंतचा ज्वलंत इतिहास आहे. मुंबईच्या कॉं. डांगे, मिरजकर यांच्या मार्गदर्शनाखाली संघटित केलेल्या अनेक चळवळी बांधलेली कामगार युनियन 1928 साली मुंबईच्या 84 गिरण्या बंद पाडणाऱ्या झालेल्या ऐतिहासिक संप, हुतात्मा झालेले परशुराम जाधव दुसऱ्या महायुद्धा वेळी भांडवलशाहीचा अधिक कार्य करण्यासाठी मुंबईच्या कामगारांनी उचललेली लढाऊ पाऊले खलाशांच्या बंडाला मुंबईच्या कामगारांनी दिलेला पाठिंबा हा सारा मुंबईच्या कामगारांचा इतिहास पोवाड्यातून वर्णिलेला आहे. तसेच शेतकरी कामगार पक्षाने अण्णाभाऊंच्या संवेदनशील मनावर झालेला परिणाम पोवाड्यात उलगडला आहे तो कामगारांना आपलासा वाटतो. कामगार वर्गाच्या वर्गीय जाणीवा समृद्ध करणारा हा पोवाडा खरा अर्थाने वर्गीय साहित्यात भर टाकणारा आहे.

मुंबई उंचावरी | मलबार हिल इंद्रपुरी |
कुबेराची वरती तिथं सुखभोगती ||
परळात राहणारे | रात्रंदिवस राबणारे |
मिळेल ते खाऊन घाम गाळतो ||

यातून मुंबईतील विषमतेचे अन्यायाची दारिद्र्याची कष्टकऱ्यांच्या वेदनेचे आणि भांडवलदार श्रीमंत शोषकांच्या सुखविलासाचे तुलनात्मक दर्शन घडले आहे.[५]

अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचे वर्णन करताना कामगार युनियनचे नेते कैलासवासी आप्पासाहेब पाटील म्हणतात – मुंबईच्या कामगार मैदानावर कडाडणारी अण्णाभाऊंची हालगी मी ऐकली आणि त्यांच्या शाहिरीतून त्वेशाचा, जिद्दीचा ,लाव्हारस माझ्या मनात खोलवर ओतला.

अण्णाभाऊंची ' माझी मैना 'ही लावणी भांडवलशाही जीवन पद्धतीने कामगार कष्टकरी यांच्या घरदार आणि माणसापासून केलेली क्रूर ताटातूट, विरह मुंबईतील कामगार व त्याच्या मनाची तगमग व्यथा व्यक्त करते.[६]

**अण्णाभाऊंची राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्य:**

'पंजाब दिल्लीचा दंगा' या पोवाड्याच्या माध्यमातून अण्णाभाऊंनी युवक क्रांतीकारक सैनिक शेतकरी कष्टकरी यांना जातीयवाद्यांच्या वादळात अडकलेली भारतीय स्वातंत्र्याची लोकशाहीची समाजवादाची नका प्रतिगामी शक्तीच्या वादळातून बाहेर काढण्याची विनंती केली आहे.

**तेलंगणा संगम :**

तेलंगणातील कष्टकरी जनतेने दिलेल्या अभूतपूर्व लढायला आव्हान देण्यासाठी अण्णाभाऊंनी पोवाडा लिहिला तेलंगणातील शेतकऱ्यांना मदत करण्याचे आव्हान त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांना केले.

स्टॅलिन

**ग्रँडचा पोवाडा :-**

1942 साली हा पोवाडा लिहिला. यात दुसऱ्या महायुद्धातील स्टॅलिन ग्रांडचा चा अविस्मरणीय लढ्याची गाथा सांगितली तसेच बर्लिन पोवाडा लिहून नाझी शाहीच्या निर्दालनाची कथा सांगीतली. यातून श्रमिक जनतेच्या संघर्षाचे शाहीरनी नवा आशय नवे अनुभव दिले.[७]

एकूणच अण्णाभाऊ साठे यांच्या कामगार कष्टकरी वर्गाच्या योगदानाचे कार्य पाहता सामाजिक वास्तव राजकीय चळवळी यांच्याशी निगडित होते वास्तव जीवनाच्या अनुभवातून उपेक्षित वंचित असणाऱ्या कष्टकरी कामगार वर्गाच्या भावना त्यांच्या साहित्य पोवाडा गाणी याच्या माध्यमातून उमटल्या व त्या समाजापर्यंत पोहोचवून एक प्रेरणा निर्माण झाली केवळ भारतीय प्रश्नच नव्हे तर आंतरराष्ट्रीय प्रश्न लढा याची वर्णन त्यांच्या साहित्यात दिसून आलेले आंतरराष्ट्रीय पातळीवरही त्यांनी ख्याती मिळवलेली दिसते.

**संदर्भ**

1. डॉ.गुरव बाबूराव – अण्णाभाऊ साठे समाज विचार आणि साहित्य विवेचन, प्रकाशक राजन बावडेकर, लोकवांग्मय ग्रह, मुंबई, १९९१ ,पान नंबर 5
2. मोरे सुबोध – कष्टकऱ्यांच्या चळवळीचा पाठीराखा, (लेख) महाराष्ट्र टाइम्स, १४ सप्टेंबर २०२२ पान नंबर ४
3. डॉक्टर कऱ्हाडे सदा -अण्णाभाऊ साठे व्यक्तित्व आणि कृतीत्त्य ,लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद २००९ पान नंबर ६
4. डॉ. कऱ्हाडे सदा -उपरोक्त पान नंबर १५
5. डॉ. गुरव बाबुराव- उपरोक्त पान नंबर ११५
6. डॉ. गुरव बाबुराव उपरोक्त पान नंबर १३५
7. डॉ. कऱ्हाडे सदा - उपरोक्त पान नंबर १९